REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# कृषीमालाच्या मुल्यांतील उच्चवचने

प्रा. डॉ. आसावरी आर. दुर्गे
तायवाड़े महाविद्यालय, महादुला, कोराडी.



भारत प्राचीन काळापासून एक कृषीप्रधान देश आहे. देशातील अधिकांश रहिवासी आज ही कृषी द्वारा आपली उपजीवीका करीत आहेत. भारतातच नाही तर जगातील इतर देशात सुद्धा कृषी एक महत्वपूर्ण व्यवसाय आहे. कारण की मनुष्याच्या मुलभूत आवश्यकतेच्या पूर्तीचे हे एक महत्वपूर्ण साधन आहे. कोणत्याही देशात उद्योगाच्या विकासाच्या अगोदर कृषीचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. भारतासारख्या देशाला जीथे लोकसंख्येच्या मोठया भागाला अन्नधान्य शेतीमधून प्राप्त होते तेव्हा शेती व्यवसायाचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे.

भारत एक असा देश आहे. जीथे शाकाहारी लोकांची संख्या सर्वाधिक आहे व भारतीय जेवणात कृषी द्वारा उत्पादीत पदार्थ असणे स्वाभाविक आहे. खाद्यान्य, डाळ, तिळ, शेंगदाणे, भाजीपाला, फळे इत्यादी कृषीचीच देण आहे. याशिवाय दुध, तुप, लोणी, दही हा व्यवसाय सुद्धा कृषीवरच आधारीत आहे. हे बरोबर आहे की भारतीय शेती आत्मनिर्भर नाही. कारण आपली संपूर्ण खाद्याान्याच्या आवश्यकतेची पूर्ती करणे सुद्धा संभव नाही. हया कमतरतेची पूर्ती आयातरद्वारे पूर्ण करावी लागत आहे. परंतु कृषी सुधारणे द्वारे देशाला आवश्यक असणारे अन्नधान्य उत्पादन करणे शक्य आहे. हरीतक्रांती मुळे वरील कथनाला पृष्टी मिळाली आहे व आज देश खाद्यान्य उत्पादनात जवळपास स्वावलंबी झाला आहे.

स्वतंत्र अर्थव्यवस्थेत वस्तु मूल्यात परीवर्तन एक स्वाभावीक क्रमानुसार होते. कारण वस्तुचा पुरवठा व मागणी यात सामंजस्य स्थापीत होवून आकस्मीक कारणामुळे वस्तूचे मूल्य कधी वाढते तर कधी त्यामध्ये घट होण्याची प्रवृत्ती निदर्शनास येते. स्वतंत्र स्पर्धा असल्यामुळे कोणत्याही वस्तूचे मूल्य खूप काळ पर्यंत जास्त व कमी सुद्धा राहू शकत नाही. परंतु हा सिद्धांत केवळ विकसित अर्थव्यवस्थेला लागू होतो. अविकसीत व विकसनशील अर्थव्यवस्थेत कृषीला अत्याधीक महत्व असल्यामुळे कृषी पदार्थाचे मूल्य केवळ मागणी व पुरवठाच्या सिद्धांताद्वारे निश्‍चित होत नाही. त्यातील परीवर्तन अनेक आंतरीक व बाहय तत्वाद्वारे प्रभावीत होते.

## कृषी कींमतीतील परिवर्तन :

भारतीय कृषी मागासली असण्याचे कारण कृषी विकासातील नैसर्गिक व मानवीय दोनही तत्वे बाधक आहे. कृषी मूल्यात अत्याधीक चढ उतार होतात. या तथ्याच्या गंभीरतेचा अनुमान होवू शकते की गहू, तांदुळ अथवा अन्य खाद्यान्यच्या कीमती पीकांच्या वेळी व नंतरच्या मूल्यात कधी कधी १०–१५ रूपये प्रती मन पर्यंत अंतर येत असते. या परीवर्तनामुळे कृषी पदार्थ साठविणारे व्यापारी मनमाने लाभ मिळवितात. शेतकऱ्याला मात्र याचा कोणताच भाग मिळत नाही आणि उपभोक्त्यांना अधिक समस्यांचा सामना करावा लागतो. कृषी पदार्थांच्या कींमतीत चढ उतार होण्याचे कारण पीकांचा विक्रीचा हंगाम. याकाळात शेतकरी माल विकून घरी जातो तर तो माल व्यापारी खरेदी करून नंतर त्याला जास्त कींमतीत

विकतात. व्यापारी कृत्रीम अभाव निर्माण करून लाभ कमवितात. तसेच केंद्रीय बॅकेची ऋण नीती उदार असेल तर कमी दरात केंद्रीय बॅक व्यापारी बॅकेला व व्यापारी बॅक व्यापाऱ्यांना अधिक मालाची संग्रहण करण्याकरीता कर्ज देते व कींमतीत वाढ होते. उलट कर केंद्रीय ऋण नीही जास्त दरात व्याज देते तेव्हा व्यापारी बॅक सुद्धा व्यापाऱ्यांना जास्त दराने ऋण देते त्यामुळे व्यापारी माल खरेदी करून लवकर विकतात व कृषी कींमती कमी होतात.

### अन्नधान्यांच्या कींमतीत चढ उतार होण्याचे दोष :

कृषी मालाच्या कींमती भारत देशाच्या अर्थव्यवस्थेवर व्यापक प्रभाव पाडतात. जर कींमती वाढल्या तर यामुळे कच्यामालाच्या व्यापाऱ्याला विशेष लाभ होतो. कारण की त्यांच्याजवळ मालाचा साठा असतो. त्यामुळे औद्योगिक मालाच्या कींमतीत वाढ होत जाते आणि उपभोक्त्यांना जास्त कींमत देणे भाग पडते.

कींमतीत पीकांच्या विक्री वेळी कमी होते. त्यामुळे नुकसान हे शेतकऱ्यांचे होते आणि पुढे त्या जमीनीवर दुसरे पीक घेणे सुरू करतात. म्हणूनच उसाचे उत्पादन नियीमत ठेवण्याकरीता भारत सरकारला प्रती वर्ष उसाचे मूल्य निर्धारीत करावे लागते.

यावरून असे स्पष्ट होते की कृषी वस्तुंची कींमत परीवर्तनातील लाभ जास्त करून व्यापारी कमवितात आणि हानी मात्र शेतकरी अथवा उपभोत्यांना सहन करावी लागते.

### कींमतीत स्थीरतेची आवश्यकता :

कुमरप्पा समीतीच्या मतानुसार कोणत्याही देशाच्या भूमी सुधारणेचा मुख्य उद्देश त्या देशाचे कृषी उत्पादनाला आदर्श अथवा उच्च पातळीवर नेणे हा असतो. जर हे शक्य झाले तर कृषी उत्पादन अत्याधिक होते आणि कधी कधी त्याच्या कींमतीत घसरण येण्याची शक्यता निर्माण होते. अश्या वेळी सरकारद्वारे असे प्रयत्न केले गेले पाहिजे, की ज्यामुळे कींमती खूप कमी होता कामा नये. अमेरीकन सरकार प्रती वर्ष कीतीतरी उत्पादन स्वत: खरेदी करते. जेणे करून अतीरीक्त उत्पादनामुळे होणाऱ्या नुकसाना पासून शेकतऱ्यांचे सरंक्षण व्हावे. परंतु अविकसित व विकसनशील देशात दोन समस्या उत्पन्न होऊ शकतात.

१) कृषी उत्पादनाचे प्रमाण जास्त

२) कृषी उत्पानाचे प्रमाण कमी

### १) कृषी उत्पादनाचे प्रमाण जास्त :

जर देशात कृषी उत्पादन जास्त झाले तर कींमत कमी असण्याची शक्यता असते. ज्यामुळे शेकतऱ्यांना नुकसान होवु शकते. आणि भविष्यात त्या वस्तूचे उत्पादन कमी होण्याची भीती असते.

या परीस्थीतीचा एक प्रभाव असाही होतो की उद्योगाला कच्चामाल मिळविण्याकरीता कठीण जाते व त्याची कींमत वाढण्याची प्रवृत्ती उत्पन्न होते. अशा प्रकारे कींमती कमी झाल्यामुळे शेतकरी व औद्योगिक विकासाला नुकसान होते आणि उपभोक्याला हया वस्तू कमी कींमतीत मिळतील अशी मान्यता केवळ सैद्धांतीक व काल्पनीक आहे. कारण व्यवहारीक जीवनात कच्चा माल स्वस्त होवून ही उद्योगपती निर्मीत मालाचे मूल्य कमी करीत नाही. कारण की एकदा मूल्य कमी केले की त्यात वृद्धी करणे कठीण होते. म्हणून मूल्य स्थिर ठेवणेच उचीत धोरण आहे.

### २) कृषी उत्पानाचे प्रमाण कमी

जर देशात कृषी मालाचा अभाव असेल तर स्वाभाविक त्याच्या मूल्यात वृद्धी होण्याची शक्यता असते. परंतु पीक विक्री वेळी ही कींमत सामान्य असते तर नंतर ती जास्त होते.

वरील दोन्ही परीस्थीतीत प्रभाव विस्तृत व व्यापक होतो. अर्थात

१) कींमत वाढीमुळे उपभोक्त्याला जास्त कींमत द्यावी लागते.

२) कींमत वाढीचा जास्तीचा भाग हा व्यापाऱ्यांना मिळतो.

३) औद्योगिक निर्मीत मालांच्या कींमतीत वाढ होत जाते.

४) शेतकऱ्यांना तर पहीले पेक्षा जास्त कींमत मिळते परंतु त्याची राशी ही कमी होते. आणि सोबतच त्याला निर्मीत उपभोग्य मालाची अधिक कींमत द्यावी लागते.

वरील तर्कावरून हे स्पष्ट होते की, कृषी मालाच्या कींमतीत विशेष वाढ होवू देणे हे न्याय संमत नाही. म्हणून मूल्य स्थिरची भीतीच योग्य म्हटली जावू शकते.

## कींमतीत चढ उतार झाल्यामुळे शेतकऱ्यांना होणारे नुकसान :

कींमतीत अस्थीरता हे शेतकऱ्यांना त्रासदायक होते. कारण त्यांना पेरणी करीता बी—बीयाणे खरेदी करावे लागतात ज्याची कींमत महाग असल्यामुळे ऋण घ्यावे लागते! मात्र कींमतीत अनिश्चितता हा एक दुष्प्रभाव असा होतो की भूमीच्या विकासाकरीता व कृषी सुधार सुधारणे करीता कोणतेही विनियोजन केले जात नाही. कारण त्या पुंजीचे उचित प्रतीफल मिळण्याची कोणतीही शाश्वती नसते. करीता कृषी मालाची योग्य कींमत निर्धारीत करायला पाहिजे व त्यात खालील बाबींचा समावेश असावयास हवा.

१) भूमीचे भाडे, २) बी—बीयाणाची कींमत, खताची कींमत, ३) कृषी साधनाचा घसारा, ४) सिंचनाची लागत, ५) बैलाचा खर्च, ६) शेत मजुराची मजुरी, ७) कृषी ऋणावरील व्याज, ८) अन्य खर्च

त्या व्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या सामान्य जीवन स्तराकडे लक्ष ठेवले पाहिजे.

## शेतमालाची निर्धारीत कींमत ठेवण्याकरीता उपाय योजना :

१) पीक नीघण्याच्या आधीच कींमत निश्चित करणे.

२) जर निश्चित कींमतीत घट होत असेल तर सरकारने ते खरेदी करून शेतकऱ्यांना सुरक्षितता प्रदान करणे.

३) जर शेतमालाच्या उत्पादनात विशेष घट झाल्यास आयातीचा सहारा घेवून ती कींमत संतुलीत करणे.

४) आयात व निर्यातीतील सरकारने लवचीकता ठेवणे.

५) योग्य प्रशासन व्यवस्थान कींमत स्थीरते करीता सरकारने नियंत्रण व स्वस्त धान्य दुकानांची सुरवात करणे किंवा दुकादारांना प्रतिनिधी नियुक्त करणे.

६) शेतमालाच्या वितरणाचे कार्य सहकारी गोदामांकडे सोपविणे कारण या गोदामांचे मुख्य कर्तव्य जनतेची सेवा करणे असते. लाभ कमविणे नसते.

७) योग्य कींमत या मालाला मिळत नसेल तर हानी सरकारने सहन केली पाहिजे.

८) निर्धारीत मूल्यापेक्षा जास्त मूल्य घेणाऱ्यांना दण्ड व शिक्षा देण्याची व्यवस्था करणे.

९) विभिन्न मालाच्या संग्रहणाची मात्रा व स्थान निश्चित करून त्यानुसार गोदामांची निर्मिती करणे.

१०) आयात—निर्याती संबंधी कोटा ठरविणे व मूल्य नियंत्रण अन्य कार्यवाही करणे.

११) उत्पादन व पूर्ती स्त्राव कींमतीत व नियंत्रीत करणे.

१२) निश्चित कींमत निर्धारण भीतीची घोषणा करून त्याची योग्य अमलबजावणी करणे.

१३) सत्ताधारी पक्षाने राजनीतीक हिताकडे कमी व देशाच्या आर्थिक हिताकडे जास्त लक्ष देवून तशी आर्थिक नीती विकसित करून शेतमालाच्या कींमती संबंधी समस्या सोडविणे आवश्यक आहे.

१४) कृषी कींमत नीतीचा मुख्य हेतू हा उपभोक्ता व शेतकऱ्यांच्या हीताचे संरक्षण करणे हाच असला पाहिजे.

१५) अतिरिक्त शेतमालाचा उपभोग निर्मीत वाढवून त्या भांडवल उपभोग विकासाकरीता आधुनिक यंत्रसामुग्री व तंत्रज्ञानाच्या आयाती करीता करावयास हवा.

१६) कृषी मालाच्या कींमतीकडे फक्त मागणी बाजूनेच नाही तर पूरवठा बाजूने (लागत मूल्याचा) विचार व्हावयास हवा.

१७) शेतामाल विक्री बाजाराच्या प्रमुख मंडी व त्यांच्या बाजार मूल्याची संपूर्ण माहिती आणि प्रत्येक गाव व्यवस्थीत मंडीद्वारे सुव्यवस्थीत जोडणे सुद्धा महत्वपूर्ण आहे.

## संदर्भ सूची :


१) कुमार राजीव, **‘आर्थिक उच्चावचन’** अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली.

२) यादव सुबह सिंह, यादव हेमा, **‘विश्वव्यापार संगठन एवं कृषि अर्थव्यवस्था** सबलाइन पब्लिकेशन्स, जयपूर.

३) प्रा. हणवंते कमलाकर, **‘विदर्भातील सहकारी बॅंकाचा शेतकऱ्यांशी संबंध’,** प्रथम आवृत्ती.

४) पी.के. वासुदेव, **‘विश्व व्यापार संघटन’**, ज्ञानगंगा, दिल्ली.

५) एस.पी. सिंह, **‘आर्थिक विकास एवं नियोजन’**, एस. चन्द एण्ड कंपनी लि.मि. २००५

६) ओ.पी. शर्मा, **‘भारत में नियोजित विकास और आर्थिक उदारीकरण’**, आर.बी.एस.ए. पब्लिशर्स प्रथम संस्कररण १९९९.

७) डॉ. सुभाष गंगवाल, **‘भारत का विकास दशा एवं दिशा’**, मंगलदीप पब्लिकेशन्स, प्रथम संस्करण, २००४.